को. वि.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर

रामाक्र- ९८/एनएपी-३४/२०१६-१७
जा.क्र./प्रस्त/जिल्हाधिकारी/कावि-१४३८/१६
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नागपूर
दिनांक- २२ नोव्हेबंर -२०१६

(आदेश पारित दिनांक २२ नोव्हेबंर -२०१६)

अर्जदार संदीप डेव्ह. प्रा. लि. तर्फे गौरव अशोक अग्रवाल, रा. नागपूर, जि.नागपूर यांनी त्यांच्या भोगवटयात असलेली मौजा-लाव्हा, तालुका-नागपूर ग्रामीण खसरा क्रमांक- ७३/२, आराजी ०.५१ हे आर, शेत सर्व्हे क्रमांक ७४, आराजी १०.६६ हे.आर पैकी ०.८० हे आर एकुण आराजी १.३१ हे आर (१३१०० चौ मि), प.हं.नं. ०४. जागा शैक्षणीक वापराकरीता अकृषक करण्याची परवानगी मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केला.

प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद केलेल्या विभागांचे अहवाल/ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झाली असून, इतर विभागानी परवानगी देण्यासाठी अनुकुल अभिप्राय नमुद केलेले आहेत.

०१) कार्यकारी अभियंता(मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचा तात्पुरता अहवाल मंजूरी दिनांक २३.०८.२०१६
०२) तहसिलदार नागपूर ग्रामीण यांचे अनुकुल अहवाल प्राप्त दिनांक १६.११.२०१६

कार्यकारी अभियंता(मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे पत्र क्रमांक का.अभि.(मेट्रो)/सहा.अभि.-१/६०८२ दि. २३.०८.२०१६ अन्वये तात्पुरती मंजूरी दिलेल्या अकृषक अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे

1	LAND AREA OF KH. NO. 7/2 & 74	:-	111700.00 Sq. M.
2	AREA UNDER AFFORDABLE HOUSING RESERVATION	:-	98600.00 Sq. M.
3	AREA UNDER PROPOSAL	:-	13100.00 Sq. M.
4	GROSS LAYOUT AREA	:-	12851.25 Sq. M.
5	AEA UNDER INTERNAL ROAD	:-	491.63 Sq. M.
6	AREA UNDER PLAYGROUND	:-	5141.76 Sq. M.
7	BALANCE AREA OF SCHOOL	:-	7217.86 Sq. M.

कार्यकारी अभियंता(मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी नमुद केल्याप्रामाणे अर्जदारास विषयांकित प्रकरणी शैक्षणीक वापरास अकृषक परवानगी दयावयाची असल्यामुळे अकृषक सारा पुढील प्रमाणे निर्धारित करण्यांत येत आहे.

एकूण क्षेत्रफळ १११७०० चौ.मि. पैकी अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच १३१०० चौ.मिटरला ४० पैसे प्रति चौ.मि. याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये ५२४०/- ग्राम पंचायत सेस कर अकृषक कराएवढा रु. ५२४०/- जिल्हा परिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रु. १६६८०/-, परावर्तीत कर अकृषक सा-याचे ५ पट म्हणजेच रु. २६२००/- असे एकूण रुपये ७३३६०/- आकारणी निर्धारित होते.

वरील बाबी विचारात घेता महाराष्ट्र महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमिनीच्या वापरास बदल व अकृषक आकारणी) नियम १९६९ मधिल तरतुदीनुसार व त्याअंतर्गत मला असलेल्या अधिकारानुसार मी, जिल्हाधिकारी, नागपूर विविध विभागांनी घालून दिलेल्या खालील अटी व शर्तीस अधिन राहून अर्जदार संदीप डेव्ह. प्रा. लि. तर्फे गौरव अशोक अग्रवाल, रा. नागपूर, जि.नागपूर यांनी त्यांच्या भोगवटयात असलेली मौजा-लाव्हा, तालुका-नागपूर ग्रामीण खसरा क्रमांक- ७३/२, आराजी ०.५१ हे आर, शेत सर्व्हे क्रमांक ७४, आराजी १०.६६ हे.आर पैकी ०.८० हे आर एकुण आराजी १.३१ हे आर (१३१०० चौ मि), प.हं.नं. ०४. जागा शैक्षणीक वापरासाठी तात्पुरती परवानगी देण्यास मान्यता देत आहे. अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सनद निर्गमित करण्यांत येईल.

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी व्दारे अनुमोदीत)

जिल्हाधिकारी नागपूर

-स्वा-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी नागपूर

प्रातिलीपी :-

१) कार्यकारी अभियंता(मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना माहिती करिता अग्रेषित
२) तहसिलदार नागपूर ग्रामीण यांनी उपरोक्त आदेशाची नोंद तालुका नमुना-२ व तलाठयामार्फत गाव नमुना-२ मध्ये घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३) तलाठी लाव्हा, ता. नागपूर ग्रामीण यांना माहिती व उचित कार्यवाही करिता.
४) उप अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर ग्रामीण.
५) अर्जदार संदीप डेव्ह. प्रा. लि. तर्फे गौरव अशोक अग्रवाल, रा. नागपूर, जि.नागपूर यांनी उपरोक्त अटी व शर्ती पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी अग्रोषित आपण अकृषक कराची रक्कम रु. ७३३६० असून आपण सदर अटी व शर्तीची पूर्तता झाल्यानंतरच प्रत्यक्ष अकृषक वापरास सुरुवात करुन याबाबत कार्यकारी दंडाधिकारी, यांच्या समक्ष केलेले शपथपत्र सादर करावे.

(अविनाश कातडे)
जिल्हाधिकारी नागपूरकरीता